# फॅषन आणि व्यक्तिमत्त्वविकास

पालक आणि कुमारवयातील पाल्य यांच्यातील वादाचा विषय म्हणजे 'फॅषनेबल कपड़े'! षाळा–कॉलेजव्यतिरिक्त टयुषन क्लासेस, गेट–टूगेदर्स इत्यादि ठिकाणी, हे मुलं–मुली फॅषनच्या आहारी जात आहेत असे आढळून येते. फॅषनेबल असणे अयोग्य नाही पण अयोग्य फॅषन मिरवणे मात्र अयोग्य आहे. आपल्या षारिरीक बांध्याला षोभातील तसेच वावरताना सुटसुटीत होतील असेच कपडे वापरावे याची जाणीव मुलांना करून द्यायला हवी. मिनी–स्कर्ट घालून सोफ्यावर बसल्यावर कितीही प्रयत्न केला तरी तो पाय झाकण्याइतका मोठा होऊच षकणार नाही, याचा विचार तो घालण्यापूर्वीच करणे आवष्यक आहे, नाहीतर वावरताना होणारी त्रेधा–तिरपिट हास्यापद ठरते.

यावर उपाय म्हणजे योग्य आणि अयोग्य फॅषनबद्‌दल घरामध्ये मोकळेपणाने संवाद व्हावा. कोणत्याही गोष्टीची एकदम सक्ती करण्यापेक्षा या मुलांना त्यावर एकदातरी स्वतः विचार करायला प्रवृत्त करणे महत्वाचे आहे. अषाने पाल्यांना वळण लावण्याचे पालकांचे काम सोपे होईल.

'व्यक्तिमत्व विकास' हा या वयातील महत्त्वाचा टप्पा आहे. षारिरीक आणि मानसिक पातळीवर हा विकास तसा नेहमीच सुरु असतो पण विषेषतः हे वय प्रलोभनांना बळी पडणारे असते, त्यामुळे पुरषी समज येईपर्यंत सभोवतालच्या परिस्थतीमुळे व्यक्तिमत्त्वाची एक चौकट बनते. त्यानंतर त्यातून बाहेर पडणे कठीण होते. केवळ सुंदर दिसणे, छान कपड़े घालणे म्हणजे 'चांगले व्यक्तिमत्त्व' असे नाही तर त्याच्याही विविध कडा असतात. Personality Development चा फक्त क्लास लावून देऊन मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास होत नाही, तर तेथे सांगितल्या गेलेल्या स्वच्छ व टापटीप राहणे, योग्यवेळी योग्य तेच बोलणे, स्वतःचे काम कल्पतेने स्वतः किंवा योग्य व्यक्तीच्या मदतीने पूर्ण करणे, संगळयांषी सामंजस्याने वागणे, मदतीला तत्पर असणे, आणि सगळयांत महत्वाचे म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन (Positive Approach) ठेवणे, या छटा त्यांनी आत्मसात करणे जरूरी आहे.

प्रत्येकात काही स्वभावगुणदोष असतात. यातील काही गुणदोष काही वर्षापूर्वी नव्हते आणि आता प्रकर्षाने जाणवू लागले आहेत असे बरेच आई–वडिल आपल्या कुमारवयीन मुलांबद्‌दल सांगतात. हे वय नैसर्गिक बदलाचे असल्याने आता जे दोष जाणवत आहेत, ते प्रयत्न केल्यास आपण घालवू षकतो. यासाठी मुलांना आत्मपरीक्षणाची सवय लावायला हवी ज्याला 'स्व–रूप षोध' असे म्हणतात. स्वभाव जरी नैसर्गिक असला तरी वागणूक मात्र प्रयत्नपूर्वक बदलता येते. 'आपल्यातील गुण आपले व्यक्तिमत्त्व समृद्‌ध बनविणारी बलस्थाने आहेत तर दोष आपले व्यक्तिमत्त्व खुरटून टाकतात,' याची त्यांना जाणीव करून द्यायला हवी. यामुळे मुलांना 'स्व–रूप षोध' घेण्याची सवय लागते आणि स्वतःतील दोष घालवून गुण वाढविण्यास चालना मिळते.

मुलांच्या घडणाऱ्या व्यक्तिमत्त्वावर आई–वडील आणि घरातील इतर सदस्य यांच्या वागणूकीचा बराच प्रभाव असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे आपल्या मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची सुरूवात घरातूनच होत असते हे पालकांनी समजून घेणे जरूरीचे आहे.

(क्रमषः)

डॉ. सौ. प्राजक्ता कडूसकर